
# परिशिष्टये



# मानपत्र.

महात्मा मोहनदास
करमचंद गांधी
यांचे चरण सेवेसी—

॥ राष्ट्रदेवो भव ॥

## पूज्यतम महात्माजी,

सहा वर्षांनंतर कराडास आज आपली दुसरी भेट आहे, अशावेळीं येथील नगरसभेतर्फे आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्यास आनंद होत आहे. लोकमान्य टिळकांच्या हृदयविदारक मृत्युनंतर अखिल भारतीय राजकारणाची धुरा खांद्यावर घेऊन आपण राष्ट्राला असहकारितेचा तडफदार मार्ग दाखवून राष्ट्रांत स्वावलंबनाची, आत्मनिरीक्षणाची, समतेची आणि धैर्याची ज्योत प्रज्वलित करून राष्ट्रांत एक प्रकारचा जोम आणलात. आपले राजकीय गुरु भारत सेवक गोखले म्हणत असत त्याप्रमाणें 'राजकारणाला पारमार्थिक शुद्धतेची' जोड आपण इतक्या उज्वलतेनें दिली आहे कीं, विसाव्या शतकांतील 'येशूख्रिस्त' म्हणून जग आज आपणाला वंदन करीत आहे.

अस्पृश्यता निवारणासंबंधांहि आपण मोठें वंदनीय कार्य केलें आहे. सहा कोटी देशबांधवांना दूर लोटण्याइतकी निर्दयता, परंपरेच्या चक्रावर बसलेल्या भारतीयांच्या मनांत घर धरून बसली असतां, तिला आपण मनानें, वाणीनें व कृतीनें दूर झुगारून दिलीत, आणि त्याचा चमत्कार असा झाला कीं, राष्ट्राचे डोळे साफ उघडून त्या दिशेकडे खिळले. परकीयांची गुलामगिरी नको असेल तर घरच्या गुलामगिरीला गाडून टाकलें पाहिजे, हा आपला विवेकप्रधान संदेश राष्ट्रीय तरुणांच्या मनांत आतां इतका ठसला आहे कीं, कोणीहि स्वराज्येच्छु अस्पृश्यतेस यापुढें क्षणभर थारा देईल असें वाटत नाहीं.

कराडच्या नागरिकांनी आपला पवित्र संदेश यथाशक्ति आचरणांत उतरविला असून स्वदेशी व अस्पृश्यता निवारणासंबंधांत कराडकर मागे नाहीत. येथील हिंदुमहासभा व आरोग्य-मंडळ या संस्थांनी अस्पृश्यांच्या अंतर्बाह्य शुद्धतेसाठी नियमित प्रयत्न चालविले असून महात्माजींच्या कौतुकास पात्र होण्यासारखें हें सत्कार्य कराडास लौकरच साहाय्यानें महात्माजींस कळविण्याचा सुयोग येईल अशी आम्हांस खात्री आहे.

हिंदुमुसलमानांच्या ऐक्याबद्दल आपण केलेले प्रयत्न आज ना उद्या दोनही समाजास उपयुक्त होणार आहेत, तेव्हां परमेश्वरानें आपणांस भारतवर्षाची व त्यायोगें जगाची उत्क्रांती करण्यास दीर्घायुरारोग्य द्यावें अशी आमची प्रार्थना आहे.

नगरसभा ही गांवची प्रातिनिधिक संस्था होय. अर्थात् गांवाचें संकलित प्रतिबिंब नगरसभेंत दिसणार हें उघड आहे. नगरसभेनेंहि आपल्या शक्तीनुरूप महात्माजींच्या दिव्य कार्यास मदत केली आहे. आम्ही आज करीत असलेलें महात्माजींचें कृतज्ञ स्वागत महात्माजींनीं उदार मनानें गोड करून घ्यावें अशी विनंति आहे. लोकाग्रणींना मानपत्र समर्पण करण्याचा नगरसभेच्या आयुष्यांतला हा दुसरा प्रसंग होय. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे अग्रणी श्री. तात्यासाहेब केळकर यांना त्यांच्या देशसेवेबद्दल मानपत्र अर्पण करण्याचा सुयोग आला होता. त्यानंतर आज आपल्यासारख्या जगद्वंद्य विभूतीस मानपत्र देण्याचा योग आल्याबद्दल नगरसभेस अत्यानंद होत आहे.

शेवटीं राष्ट्रीय कार्यास हातभार लावण्यांत कराडची नगरसभा कसूर करणार नाहीं, असें महात्माजीस आश्वासन देऊन महात्माजींच्या मंगल आशिर्वादाची अपेक्षा करून आम्ही आपली रजा घेतों. १७-२-१९२७.

आपले,

१. हाजी अहमद कासम कच्छी, प्रेसिडेंट.
२. किसनलाल प्रेमराज, व्हा. प्रेसिडेंट.
३. श्रीधर यशवंत देशपांडे डॉक्टर.
४. श्यामाचार्य नानाचार्य पळसुली वैद्य.
५. मारुती गोपाळ शिंदे ऑ. मे.
६. गणपत नारायण देवधर ना. मे.
७. गोविंद जोती थोरवडे.
८. इनायतुल्ला हैदरशा कागदी.
९. बुवाशा खुजादमिया काजी.
१०. गणपती शानोबा पटांणे.
११. बळवंत महादेव जाधव.
१२. अनंतराव मिठोबा मस्काण.
१३. लक्ष्मण महादेव देशपांडे.
१४. सिताराम गोपाळजी पाटील.

वंदे मातरम्!

भारताचे पंतप्रधान, राष्ट्रसभेचे अध्यक्ष नि भारतीय जनतेचे एकमेव नेते-

# - पंडीत जवाहरलाल नेहरू -

यांचे सेवेशी --

## माननीय महाशय!

कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमामुळें पुनीत झालेल्या, साधुसंतांनी सोज्वळ महत्त्व लाभलेल्या नि स्वातंत्र्यवीरांच्या अलौकिक कर्तबगारीनें विनटलेल्या या आमच्या कऱ्हाड नगरीच्या पवित्र भूमीवर, प्रजासत्ताक भारताचे पंतप्रधान म्हणून आपलें हें आज प्रथमच आगमन होत आहे. हें आपलें आगमन आमचा आनंद शतगुणित करणारें असून अत्यंत स्फूर्तिदायक आहे. या आपल्या शुभागमनानें आमच्या अंतःकरणांतील आपणाविषयींच्या सद्भावना व्यक्त करण्याची ही मोठ्याहून मोठी संधी आम्हांला लाभत आहे हें निःसंशय आमचें भाग्य होय; म्हणून अत्यंत विनम्र भावानें नि प्रफुल्लित अंतःकरणानें आमची ही नगरपालिका या आपल्या पहिल्या शुभागमनप्रसंगीं आपलें हार्दिक स्वागत करीत आहे.

नवभारताचे महान शिल्पकार या नात्यानें आपण संपादिलेल्या देदिप्यमान यशानें पौर्वात्य देशांत एका नव्या तेजस्वी युगाचा उदय झाला आहे. साम्राज्यशाहीवर मर्मभेदक प्रहार करून उपेक्षित नि पददलित मानवतेचा उद्धार करण्याचें आपलें पवित्र नि महनीय कार्य भारताच्याच नव्हे तर अवघ्या जगाच्या इतिहासांत चिरंतन राहील यांत मुळींच शंका नाही. किंबहुना अखिल जगावर प्रभुत्व गाजविण्याच्या आसुरी लालसेनें प्रेरित झालेल्या रक्तपिपासू नि बलाढ्य राष्ट्रांच्या प्रस्तुतच्या प्राणघातक स्पर्धेमुळें भयभीत झालेली मानवताच जणूं काय आश्रयासाठीं आपणाकडे अधीर आशेनें धांव घेत आहे असें क्षणभर वाटल्यावांचून रहात नाही. विश्वशांतिप्रीत्यर्थ जागतिक राजकारणाच्या प्रवाहाला नवें वळण लावण्याचे आपले प्रभावी प्रयत्न म्हणजे भारतीयांच्या श्रेष्ठ परंपरेचें एक उत्कृष्ट प्रतीकच होय. शांतीसाठीं तळमळणाऱ्या मानवजातीला सत्य नि अहिंसा यांचें जीवन देण्यासाठीं न्याय्य नि शाश्वत अधिष्ठानावर आपण नवभारताची उभारणी करून जगापुढें एक अनुकरणीय आदर्श ठेवला आहे; त्यामुळें भारतांतीलच नव्हे तर पौर्वात्य देशांतील सर्व जनता आपणांस कृतज्ञतापूर्वक शतशः धन्यवाद देत आहे.

प्रतिगामी शक्तींशीं झगडतांना वज्राहूनही कठोर बनणारें आपलें हृदय, दीन दुःखी दलितांचीं दुःखें पाहून सदयतेनें जसें उचंबळून येतें तसेंच तें निष्पाप बालकांशीं समरस होऊन

निरागस आनंदानें नाचूं बागडूं लागलेलें पाहिलें म्हणजे आपल्या विशाल नि हृदयंगम व्यक्तित्वाच्या सर्वांगीण विकासाचा प्रत्यय येतो. अलौकिक बुद्धिमत्ता, असामान्य स्वार्थत्याग, अतुलनीय कर्तृत्व नि गंगेसारखें शुद्ध चारित्र्य इत्यादि आपल्या ठायीं वसत असलेल्या विलोभनीय गुणामुळें आपण भारतीयांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेले पाहून कोणाचें अंतःकरण आनंदानें नि अभिमानानें प्रफुल्लित होणार नाहीं ? लोकशाहीवरील अढळ निष्ठा, अन्यायाची आत्यंतिक चीड, मानव जातीवरील अकृत्रिम प्रेम इत्यादि विविध गुणांचा मनोरम विलास प्रगट करणारें आपलें व्यक्तिमत्त्व म्हणजे भारताला लाभलेला परमेश्वराचा महन्मंगल प्रसादच होय !

मोहवश पार्थाला आपल्या सिंहनादानें जागृत करणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या चतुराईनें नि धीरोदात्त वृत्तीनें नवोदित भारतावरील भीषण संकट-परंपरा आरण मानवतेच्या ज्या मंगल प्रकाशानें नष्ट केलीत त्याच प्रकाशांत भारताच्या समृद्धीचा साक्षात्कार घडविण्याचें आपण जे पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहांत त्यांत आपणांस निश्चित यश लाभणार आहे असा आम्हांला नितांत विश्वास वाटतो.

भारताच्या संपन्नतेसाठीं आपण नियोजिलेल्या विविध योजना कार्यवाहींत आणण्याकरितां आमचें सक्रीय सहकार्य आपल्या पाठीशीं सदैव उभें आहे, असें आम्ही आपणांस नम्रतापूर्वक आश्वासन देऊं इच्छितो. परमेश्वर आपल्या अंगीकृत कार्यांत यश देवो नि आपणांस दीर्घायुरारोग्य लाभो हीच आमची आत्यंतिक इच्छा नि कळकळीची प्रार्थना आहे.

आपले नम्र,

१. श्री. प्रभाकर लक्ष्मण करंबेळकर, बी. ए. बी. टी., अध्यक्ष.

२. श्री. रामदास परशराम वारटके, उपाध्यक्ष.
३. ,, भीमराव नारायण जाधव.
४. ,, वसंत वासुदेव भुर्के.
५. ,, बाबुराव मारुती वास्के.
६. ,, श्रीकृष्ण महादेव कुलकर्णी,
एल्. सी. पी. एस् एल्. एम्. (डब्लिन).
७. ,, नारायण बाळाजी बुधकर,
बी ए. (ऑ.) एल्एल्. बी.
८. ,, गोपाळ रामकृष्ण काळे.
९. ,, पांडुरंग दादासाहेब पाटील, एल्एल्. बी.
१०. ,, राणू आऊबा पवार.
११. ,, गणपती अर्जुना गोरवडे.
१२. ,, पन्नालाल गोपीलाल लाहोटी.
१३. श्री. रामविलास किसनलाल लाहोटी.
१४. ,, आब्बास फरीदसो. मुतवली.
१५. सौ. यशोदाबाई महादेव वाटवे.
१६. श्री. सिताराम ज्ञानोबा शिंगण.
१७. ,, मारुती सखाराम डांगे.
१८. ,, रामचंद्र राघोबा शिंदे.
१९. ,, केशवलाल भगवानदास शहा.
२०. ,, नारायण कोंडिबा रैनाक.
२१ ,, गणपती ज्ञानू कारंडे.
२२. ,, अब्दुल रहीम फरीद मुजावर.
२३. सौ. खुदैजा उमर नदाफ.

कराड नगरपालिका, तारीख ३०-४-५३.

# कऱ्हाड नगरपालिका, कऱ्हाड.

# मानपत्र

## नामदार शंकररावजी चव्हाण

### महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री, यांचे सेवेशी –

मानणीय महोदय,

कृष्णा-कोयनेच्या प्रीति संगमाने पुनीत झालेल्या, साधुसंतांच्या वास्तव्याने संस्कारीत झालेल्या आणि भारतीय जीवनात राष्ट्रीय कर्तव्याची सतत जाणीव ठेवून वाटचाल करणाऱ्या यशवंतांच्या कराड नगरीमध्ये आपले आगमन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने आज प्रथमच होत आहे.

मानवतेच्या धर्माची शिकवण देणाऱ्या धर्मात्मा एकनाथांच्या कर्मभूमित पैठण येथे आपला जन्म १९२० साली झाला. महाराष्ट्राच्या गुणगाथा कृष्णा-कोयनेच्या या पवित्र क्षेत्री हार्दिक सत्कार करताना कराडच्या जनमानसाला होणारा आनंद शब्दातीत आहे. शिवाय या पवित्र क्षेत्रात आपले प्रथम आगमन होत असताना आपले परम स्नेहास्पद नामदार यशवंतरावजी चव्हाण यांच्या उपस्थितीत आपले स्वागत करण्यास आमच्या स्नेहशील भावना सहजपणे उत्सुक बनल्या आहेत.

राष्ट्रीय प्रवृत्तीशी सुसंवाद ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ज्या ध्येयनिष्ठेने झाली, त्याचेच श्रेय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आज साकार झाले आहे. मद्रास विद्यापीठाची पदवी संपादन करून आपण उस्मानिया विद्यापीठात कायद्याच्या अभ्यासासाठी दाखल झालात, त्या वेळेपासून आपल्या संघटनात्मक, विधायक दृष्टिकोनाची मराठी मनाला ओळख पटली. त्या काळात विद्यार्थी चळवळीचे केलेले नेतृत्व आपल्या सामाजिक व राजकीय जीवनाला दिशा देणारे ठरले. त्यानंतर हैद्राबाद संस्थानातील 'कोर्ट-छोडो' या आंदोलनांत भाग घेऊन आपल्या लढाऊ राजकीय जीवनाला सुरवात झाली.

नांदेड ही आपली कर्मभूमि! या शहराच्या सर्वांगीण प्रगतीचे आलेख आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत रेखांकीत झाले. त्याच काळात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेलाही आपले अनुभवी मार्गदर्शन लाभले. हैद्राबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक, नांदेड सहकारी मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष आणि हैद्राबाद मध्यवर्ती सहकारी संघाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून आपण केलेले कार्य हैद्राबाद राज्यातील सहकारी चळवळीला विधायक प्राणशक्तीचा पुरवठा करणारे केंद्रस्थान ठरले आहे.

नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस, हैद्राबाद काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस या पदावरून काँग्रेस पक्षाच्या कार्याला आपण उभारणी दिलीत; त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीच्या कार्यकारिणीचे व निवडणूक समितीचे सभासद म्हणून आपला चिकित्सक दृष्टिकोन आणि निस्पृहपणा महाराष्ट्र काँग्रेसच्या निग्रही नेतृत्वाला भूषणभूत ठरला आहे.

नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद मतदार संघाचा प्रभावी प्रतिनिधि म्हणून आपण मुंबई राज्याच्या मंत्री मंडळात प्रवेश घेतलात, तेव्हापासून आज अखेर महाराष्ट्राच्या जनतेची विधायक सेवा आपल्या हातून घडत आहे. महसूल, पाटबंधारे-वीज, इमारत-दळणवळण, कृषी, राज्यमार्ग परिवहन महामंडळ इत्यादि महत्त्वाच्या खात्यांचा कारभार आपल्या समर्थ मार्गदर्शनाखाली गतिमान झाला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राला कृष्णा-गोदावरी नद्यांच्या पाण्याचा न्याय्य वाटा मिळण्यासाठी आपण अपार परिश्रम घेतले आहेत. महाराष्ट्रातील नद्यांचे सर्वेक्षण करून "मास्टर प्लॅन" करण्यासाठी आपण घेतलेले परिश्रम मराठी माणसाला कृतज्ञतेने आठवावे लागतात. महाराष्ट्र विधानसभेतील काँग्रेसपक्षाला उपनेते म्हणून अत्यंत कसोटीच्या काळात आपण दिलेले नेतृत्व राष्ट्रीय सेवेत रुजू झाले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राने आपणांवर सोपविलेली जबाबदारी आपण परिश्रमाची परिसीमा गाठून यशस्वी कराल असा आम्हाला विश्वास वाटतो.

मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू आणि तेलगू या भाषांवरील आपले प्रभुत्व भारतीय एकात्मतेच्या उद्दीष्टपूर्तीसाठी निश्चितपणे उपकारक ठरेल. आपला मितभाषी स्वभाव आणि कोणत्याही समस्येची अनाग्रही वृत्तीने सोडवणूक करण्याची रीत, आपल्या कुशल नेतृत्वाला लाभलेली दैदिप्यमान भूषणे आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या वर्धिष्णु वाटचालीत आम्ही आपल्या पाठीशी सर्व शक्तीनिशी सदैव उभे राहू असा नम्रतापूर्वक विश्वास व्यक्त करून परमेश्वर आपल्या अंगीकृत कार्यात यश देवो नि आपणास दीर्घायुरारोग्य लाभो हीच आमची प्रार्थना.

**आपले नम्र,**

पांडुरंग दादासाहेब पाटील, एल्. एल्. बी., अध्यक्ष.
महादेव विनायक भंडारे, उपाध्यक्ष व सभापती, शिक्षण समिती.
श्रीनिवास रामगोपाळ लड्ढ, सभापती, बांधकाम समिती.
इस्माईल इब्राहिम बागवान, सभापती, आरोग्य समिती.
सदाशिव जीवबा कांबळे, सभापती, पाणि पुरवठा व जलनिःसारण समिती.
हणमंत कृष्णा काटवटे, सभापती, नियोजन व विकास समिती.

| | |
|---|---|
| महादेव रामचंद्र देशपांडे | वसंतराव ज्ञानदेव माने, बी. ए. बी. एड्. |
| सौ. रंगूताई रामचंद्र भोसले | मानसिंग आबासाहेब पाटील, बी.ए.,एल्.एल्.बी. |
| बाळकृष्ण तुकाराम शिंदे | विश्वनाथ पांडुरंग काळे |
| हृदयनाथ श्रीकृष्ण कुलकर्णी, डी. एम्. इ. | प्रतापराव ज्ञानोबा चव्हाण |
| बापूराव काशीनाथ शिंदे | सौ. मंदाकिनी श्रीपाद देशपांडे, बी. ए. |
| जनार्दन जोती कारंडे | माधवराव मारुतराव पवार, बी. ए. |
| भगवान बापू कांबळे, एम्. ए. | अजीज यासीन पटेल |
| ज्ञानू मारुती जाधव | रामचंद्र सोनाप्पा रेपाळ |
| धोंडीराम बाबू भोसले | रंगराव नारायण जाधव |
| युनुस अहमद कच्छी, एम्.कॉम्.एल्.एल्.बी. | प्रभाकर ज्ञानू मुळे |
| बाबासाहेब शिकंदर पटेल | भिमराव बाळू गोखले |
| शामराव गोविंद जिरंगे | जवाहरलाल तुकाराम चक्के |
| अजीज अहमद मुजावर | सौ. बनुबाई शंकर भिलवडे |
| चंद्रकांत काशिनाथ हिंगमिरे | जिजाबा रामचंद्र शिंदे |
| शंकराप्पा मल्लाप्पा संगुरे | जनार्दन बाळकृष्ण आष्टेकर |

प्रभाकर लक्ष्मण करवेळकर, बी. ए. बी. टी.

कऱ्हाड,
दिनांक २४ मे १९७५.

कऱ्हाड नगरपरिषद कऱ्हाड

# मानपत्र

## मा. नगराध्यक्ष

## श्री. पी. डी. पाटीलसाहेब,

मा. पी. डी. पाटील अमृतोत्तर महोत्सवानिमित्ताने व कऱ्हाड नगरपरिषदेच्यावतीने हे 'मानपत्र' आपल्या अठ्ठ्याहत्तराव्या वाढदिवसाच्या मंगलदिनी प्रदान करीत आहोत. याबद्दल आम्हाला आनंद व अभिमान वाटत आहे.

मा. पी. डी. पाटीलसाहेब,

कऱ्हाडच्या समाजजीवनाचे आणि सांस्कृतिक संवर्धनाचे आपण खरे शिल्पकार आहात. कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावरील जनसामान्यांची अस्मिता आपल्या रूपाने साकार झाली आहे. १ जुलै १९९५ रोजी आपल्या वयाची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होऊन आपण आपल्या अमृतमय जीवनाने आपल्या कर्तुत्वाचा अमृत वर्षाव कऱ्हाड नगरीवर अखंडपणे करत आहात. त्यातील सुमारे ४१ वर्षे आपण कऱ्हाडच्या नगरपालिकेशी सातत्याने संबंधित आहात. आपली दूरदृष्टी, गावचे असामान्य प्रेम, आपले कर्तृत्व, आपले प्रभावी वक्तृत्व व आदरणीय नेतृत्व, तसेच आपल्या मनातील विधायक विचारांचे मोहोळ यांचा समग्र परिणाम म्हणजे नव्या रूपाने नटलेली, पण अद्यापि सुविधा त्यावरप्रमाणे शहराचे सांस्कृतिक, शैक्षणिक सार्वजनिक स्वरूप सर्वांगीण संपन्न बनविलेली कऱ्हाड नगरी होय.

गावातील एक अभ्यासू तरुण वकील म्हणून वयाच्या ३४ व्या वर्षी म्हणजे १९५२ साली आपण कऱ्हाड नगरपालिकेवर निवडून येऊन कऱ्हाडच्या सांस्कृतिक क्षेत्रात पदार्पण केले व लगतच्याच वर्षी १९५३ सा आपण नगराध्यक्ष म्हणून लोकांनुसार पाय रोवले तेथपासून १९८१ सालापर्यंत रौप्य महोत्सवी नगराध्यक्ष म्हणून गिनीज बुकात नोंद होण्यासारखी कामगिरी आपल्या दैनंदिन कार्यतत्परतेतून सदैव अनुभवास येत होती. प्रशासकीय राजवटीचा कालखंड सोडला तर आजपर्यंत आपण कऱ्हाडचे नगराध्यक्ष म्हणून कृष्णा-कोयनेच्या संगमावरील या सांस्कृतिक जनमंदिरात नंदादीपासारखे तेवत आहात. कऱ्हाडचे आदरणीय नगराध्यक्ष म्हणून आपण सातत्याने लाभलात, हे कऱ्हाड नगरवासियांच्या दृष्टीने फार मोठे भाग्य होय.

'सामान्य जनतेचा, असामान्य जनसेवक' ही आपली भूमिका त्यामुळे विलोभनीय ठरली आहे. सर्वजनहित ही दृष्टी, समन्वय आणि सामंजस्य ही रीती यांचा संगम आणि स्वच्छ प्रशासन ही नीती याने प्रत्यंतर आपण कऱ्हाडच्या नागरिकांना दिलेत. अद्यापर्यंत आपल्या लोकाभिमुख कुशल प्रशासनाची कीर्ती कऱ्हाडच्या पंचक्रोशीत सातत्याने दुमदुमत राहिली आहे. आजही आपल्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेचा कारभार चालला आहे. आपल्या नेतृत्वाची प्रदीर्घ कारकीर्द निश्चितच अभिमानास्पद असली तरी त्याहीपेक्षा आपल्या कारकिर्दीत शहरात विधायक कामांची जी प्रगती [illegible]

[illegible]

अभिमान वाटतो आणि त्याची गौरवाने नोंद घेणे आम्हाला समुचित वाटते.

आपल्या सहधर्मचारिणी सौ. चंद्रकलाताई यांनी आपणास आपल्या कार्यात सदैव साथ दिली परंतु नियतीने अकस्मात त्यांना आपल्यापासून हिरावून नेले. तरी खचून न जाता, दुःख पोटात ठेवून पहिल्याच उमेदीने कऱ्हाड नगरीची वाटचाल सोबत आहात त्याबद्दल कृतज्ञता वाटते.

आपले अकृत्रिम स्वरा प्रेम, उत्कट देशाभिमान, निःस्वार्थ लोकसेवा, प्रखर पुरोगामी विचार, निराभिमानी व निरहंकारी वृत्ती, निरलस क्रियाशीलता आणि निष्कलंक चारित्र्य या सर्वगुणसमुच्चयाने सर्वसामान्यांच्या अंतःकरणात आपल्याविषयी आदरभावना आहे.

**आपणास दीर्घायुरारोग्य लाभावे ही जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करून हे मानपत्र आम्ही आपणास प्रदान करीत आहोत, त्याचा आपण स्वीकार करावा.**

मिती आषाढ शुक्ल तृतीया रोज शनिवार शके १९१६ विक्रम संवत २०५१

(दिनांक : १ जुलै, १९९५)

एल. बी. सावंत
मुख्याधिकारी
नगर परिषद, कऱ्हाड

सदस्य, नगरपरिषद कऱ्हाड

सुभाषराव डुबल
उपनगराध्यक्ष
नगर परिषद, कऱ्हाड